जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -०६ दिनांक - ०४/०१/२०२५**

युनिट- ६ गुन्हे शाखा पुणे शहर

## खुनाचा गुन्ह्यातील २ पाहिजे आरोपीतांना केले जेरबंद

दि.२७/१२/२०२४ रोजी थेऊर रोड, जय मल्हार हॉटेल जवळ ,पुणे येथे ६-७ इसमांनी फिर्यादी व त्यांच्या पत्नीस हाताने व दगडाने मारहाण करून जखमी केलेने तसेच त्यापैकी एकाने गोळीबार करून फिर्यादीची वेळ ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने लोणी काळभोर पोलीस ठाणे येथे गु. र .क्र. ६१४/२४, १०९, ११८(१), १२५, १२५(अ), १८९ (१), १८९ (२) , १९१(२) , १९१(२) , १९०, ३५२, ३५१(१), बी.एन. एस. सह कलम ३, २५, २७ भा.ह.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर घटनेनंतर आरोपी हा पळून जात असताना युनिट ६ च्या पथकाने ०३ आरोपीतास ताब्यात घेतले होते. तेव्हापासून इतर पाहिजे आरोपीतांचा गुन्हे शाखेमार्फत शोध सुरू होता. सदर गुन्ह्यातील जखमी महिला ही दि. ०१/१२/२४ रोजी मयत झालेने नमूद गुन्ह्यास भा.न्या.सं.कलम १०३ हे समाविष्ट करण्यात आले होते.

वरीष्ठांचे आदेशाने दरोडा व वाहन चोरी पथक १ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री बिडवई,युनिट ६ गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक श्री.पठाण,दरोडा व वाहन चोरी पथक २ असे गेल्या ३ दिवसापासून सतत पाहिजे आरोपींचा शोध घेत असताना आज रोजी मिळालेल्या गोपनीय बातमीवरून खालील नमूद आरोपीतांना खेड शिवापूर, पुणे येथून ताब्यात घेण्यात आले आहे.

**१)मयूर शंकर जाधव, वय ३२ वर्षे रा. मु.पो. कुरुळी, बांदल वस्ती,दत्त मंदिराच्या बाजूला ता. खेड ,जिल्हा पुणे २)प्रथमेश उर्फ सोन्या आनंदा वाहिले, वय २३ वर्षे, रा. केळगाव, चिंबळी,आळंदी रोड, राधाकृष्ण मंदिराजवळ ता.खेड,जि.पुणे**

सदर आरोपी यांना पुढील कारवाई कामी लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात येत आहे.

सदरची कामगीरी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री. अमितेश कुमार, मा.सह.पोलीस आयुक्त,पुणे श्री.रंजनकुमार शर्मा,मा.अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.शैलेश बलकवडे,मा.पोलीस उप-आयुक्त गुन्हे श्री.निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे २ श्री राजेंद्र मुळीक दरोडा व वाहन चोरी विरोधी पथक १ चे पोलीस निरीक्षक श्री.बिडवई,गुन्हे शाखा युनिट ६चे पोलीस निरीक्षक श्री.वाहीद पठाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ६, दरोडा व वाहन चोरी विरोधी पथक १ व २ कडील सहा.पोलीस फौज.दिनकर लोखंडे, राजेश लोखंडे, पोलीस अंमलदार,गणेश ढगे,प्रदीप राठोड,सुहास तांबेकर,कानिफनाथ कारखेले,नितीन मुंढे,महेश पाटील, संदीप येळे, विनायक येवले, समिर पिलाणे,गणेश डोंगरे,नितीन धाडगे यांनी आहे.